## प्रसिध्दीपत्रक

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

जा.क्र./ पोउपआ / वाह / २३४८/२०२५ पुणे दिनांक - १८ /०३/२०२५

पुणे शहरातील डेक्कन वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीत होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका,इ.) खेरीज करून खालीलप्रमाणे **अंतिम आदेश** निर्गमित करीत आहे. **"** सदर ठिकाणी यापुर्वी पार्कीगबाबत असलेले निर्बंध रद्द समजण्यात येतील **"**

### डेक्कन वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,

- **बी.एम.सी.सी. रोड वरील एन.सी.सी. कॅम्प गेट पासुन ते एस.एस.सी बोर्ड कार्यालयाकडे जाणाऱ्या रोड पर्यंत (छत्रपती शाहु महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था पुणे समोरील बाजु २० मीटर ) नो-पार्कीग झोन करण्यात येत आहे.**

( अमोल झेंडे )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर

प्रति,

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- १. **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – २ पुणे शहर.**

२. **पोलीस निरिक्षक,** प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे
२/- सदर प्रेस नोटच्या प्रति पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३. **प्रभारी अधिकारी, डेक्कन** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- सदरबाबत म.न.पा. पुणे यांचेकडून वरील प्रमाणे फलक बसवुन घेवुन ०७ दिवसांत पुर्तता अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.

४. **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी. सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.

५. **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.

६. **मा. सहाय्यक अभियंता** (ट्रॅफिक प्लॅनिंग), म.न.पा. पुणे
२/-सदर ठिकाणी वरीलप्रमाणे फलक बसविणेबाबतची कार्यवाही होणेस विनंती आहे.

प्रति, **व्यवस्थापक,** येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे
२/-सदरचा आदेश राजपत्रात प्रसिध्द करुन त्याच्या ५ प्रती इकडील कार्यालयात पाठविण्याची विनंती आहे.